स्थायी समितीच्या **सोमवार दिनांक 17–09–2018** रोजी **दुपारी 01–00** वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## उपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| **1.** | मा. श्री.विरेन्द्र उर्फ विक्की घनश्यामदास कुकरेजा | सभापती |
| 2. | मा. श्री. मनोज दशरथ सांगोळे | सदस्य |
| 3. | मा. श्री.महेश केशवराव महाजन | सदस्य |
| 4. | मा. श्री.शेषराव शंकरराव गोतमारे | सदस्य |
| 5. | मा. सौ. सोनाली शालीक कडु | सदस्या |
| 6. | मा. सौ. मनिषा चक्रधर अतकरे | सदस्या |
| 7. | मा. सौ. हर्षला मनोज उर्फ मोरेश्वर साबळे | सदस्या |
| 8. | मा. श्री. नागेश महादेव मानकर | सदस्य |
| 9. | मा. सौ. कल्पना राम कुंभलकर | सदस्या |
| 10. | मा. सौ. अर्चना विवेक पाठक | सदस्या |
| 11. | मा. सौ. अभिरूची अनिल राजगिरे | सदस्या |
| 12. | मा. श्री. भुट्टो जुल्फेकार अहमद | सदस्य |
| 13. | मा. सौ. मंगला योगीराज लांजेवार | सदस्या |

## अनुपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | मा. श्री.सुनिल दुलीचंद हिरणवार | सदस्य |
| 2. | मा. सौ. मंगला शशांक खेकरे | सदस्या |
| 3. | मा. सौ. विद्या राजेश कन्हेरे | सदस्या |

## उपस्थित अधिकारी

**1.** श्री रविन्द्र ठाकरे, मा. आयुक्त, (कार्यकारी आयुक्त)

**2.** श्री. हरीश दुबे, निगम सचिव

मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

**ठराव क्रमांक 248ः–** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 च्या कलम 63 प्रमाणे **(सा.प्र.वि / लोककर्म)** महानगरपालिकाची आवश्यक कर्तव्ये या बाबी खालील अर्थसंकल्पीय तरतुदच्या अधीन प्रशासनाने या आर्थिक वर्षात किती कामे सुरु केली व केली नसल्यास त्याची कारणमिमांसा करणे आढावा व चर्चा.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कार्यालयाने माहिती अवगत करावी या सुचनेसह विषय कार्यालयास परत करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 249ः–** **(वित्त विभाग)** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 च्या कलम 93 व 94 अन्वये स्थायी समितीने विहीत केलेल्या नमुन्यामध्ये लेखे ठेवणे व प्रशासकीय अहवाल आणि लेखा विवरणपत्रे तयार करुन स्थायी समितीस सादर करणे. उपरोक्त

विषयाच्या अनुषंगाने नियमाप्रमाणे विभागाने कार्यवाही करावी असे निर्देश स्थायी समिती देते, विभागाने नोंद घ्यावी.

**ठराव क्रमांक 250:–** **(वित्त विभाग)** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 च्या कलम 105 (1) व (2) व 106 नगरपालिका मुख्य लेखा परिक्षकाने लेख्यांची साप्ताहीक छाननी करणे व त्यासंबंधीचा अहवाल स्थायी समितीस सादर केला पाहिजे या संबंधी आढावा व चर्चा. उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने नियमाप्रमाणे विभागाने कार्यवाही करावी असे निर्देश स्थायी समिती देते. विभागाने नोंद घ्यावी.

**ठराव क्रमांक 251:–** **{विद्युत विभाग}** "नागपूर शहरातील नागरीकांना 125 लिटर्स प्रती दिन (125LPD) क्षमतेचे सोलर वाटर हिटर्स 50% सबसिडीसह पुरवठा करवून कार्यान्वयन करणे" या कामाकरीता स्थायी समिती ठराव क्र. 629 दि. 05.02.2014 चे अनुषंगाने कार्यादेश दि. 17.02.2014 नुसार 1) में. रिड्रेन एनर्जी प्रा. लि., राजकोट 2) में. जैन इरिगेशन सिस्टीम लि., जळगांव 3) में. एम.एम. सोलर प्रा. लि., नागपूर अनुक्रमे 55% (1898 नग), 23% (793 नग) व 22% (759 नग) यानुसार एकुण कामाची विभागणी करून काम देण्यात येऊन कामाची मुदत सहा महिने निर्धारीत करण्यात आल्याचे अनुषंगाने व या सहा महिन्यांच्या कालावधीत वर नमूद विभागणी केल्यानुसार प्रत्यक्षात काम देणे म्हणजेच कोणत्या नागरीकांचे निवासस्थानी हे सोलर वाटर हिटर्स उपलब्ध करवून दयावे याचे दिशानिर्देश देणे नागपूर महानगरपालिकेला जोपर्यंत नागपूर महानगरपालिकेकडे असे नागरीक अर्ज करून त्यांचा स्वतःचा 50% सहभाग वहन करण्याची तयारी दर्शवत नाही तोपर्यंत अश्या संपूर्ण नागरीकांची यादी उपलब्ध करवून देणे शक्य नसल्याने व में. रिड्रेन एनर्जी प्रा.लि., राजकोट यांनी एकूण 1114 सोलर वाटर हिटर्सचे काम केल्यानंतर मार्च 2017 मधे देण्यात आलेल्या 178 सोलर वाटर हिटर्सचे काम दिलेल्या मुदतीत पूर्ण न केल्याने संबंधीत नागरिकांनी नागपूर महानगरपालिकेकडे सादर केलेल्या डिमांड ड्राफ्टची मुदत संपल्याने असे डिमांड ड्राफ्ट रद्द झाल्याने व नागरिकांच्या रोजास बळी पडण्याची वेळ आल्याने में. रिड्रेन एनर्जी प्रा.लि., राजकोट यांच्या जबाबदारी व खर्चावर दुसरे मंजूर कंत्राटदार में. एम.एम. सोलर प्रा. लि., नागपूर यांचेकडून या 178 पैकी 83 सोलर वाटर हिटर्सचे काम करवून घेण्याची कार्यवाही करावी लागली असल्याचा विचार करता व कंत्राटदारांनी काम पूर्ण केल्यानंतरही फक्त ना.म.पा. ने ही योजना 50% अनुदान देऊन काम पूर्ण करण्याचा निर्णय होईपर्यंत कंत्राटदारांना भुगतान करणेही ना.म.पा.स शक्य झालेले नाही याबाबीचा विचार करता आता कंत्राटदारांच्या विरूध्द मुदतीमधे काम न केल्यामुळे दंडात्मक कार्यवाही करण्याची कोणतीही तरतूद उपलब्ध नसल्याने में. रिड्रेन एनर्जी प्रा.लि., राजकोट यांना त्यांना देण्यात आलेल्या कामाच्या 55% वाटयाची टक्केवारी कमी करणे या अनुषंगाने में. रिड्रेन एनर्जी प्रा.लि., राजकोट यांना देण्यात आलेल्या कोटयातील सोलर वाटर हिटर्सच्या संख्येमध्ये आवश्यकतेनुसार घट करण्यास व असे सोलर वाटर हिटर्सचे काम इतर दोन मंजूर कंत्राटदारांकडून म्हणजेच में. जैन इरिगेशन सिस्टीम लि., जळगांव व में. एम.एम. सोलर प्रा.लि., नागपूर करवून घेण्यास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 252:–** **{बाजार विभाग}** स्थायी समिती ठराव क्र. 157 दि. 25/06/2018 नुसार हिंदी भाषी शाळा येथील ओटयाचे आवंटनाबाबत मागणी केलेले मुल्य मधे सुधारणा करण्याबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 332 (अ) अन्वये असलेल्या अधिकारा अंतर्गत मान्यता देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन, तसेच

1) महाराष्ट्र मेट्रो रेल कार्पोरेशन यांनी हिंदी भाषी संघ शाळे समोरील मोकळया जागेवर ओटयांच्या एकुण 4 पंक्तीचे बांधकाम केले असुन यामध्ये एकुण ओटयांची संख्या 102 आहे. 4 थ्या पंक्तीमध्ये क्र. 77 ते 102 क्रमांकाचे 3 × 2.5 मी. चे एकुण 26 ओटे आहेत 4 थ्या पंक्तीमध्ये संपुर्ण ओटयाचे मोजमाप 39 × 5 मी. आहे. 4 थ्या पंक्तीतील संपुर्ण ओटयाचे एकसमान 18 विभाजन करून 2.16 × 5 मी. = 10.80 चौ. मी. क्षेत्रफळ जागेचे आवंटन खोवा

दलाल असोसिऐशन यांनी सादर केलेल्या यादीतील 18 खोवा व्यवसायीकांना देण्यास स्थायी समिती ठराव क्र. 157 दि. 25/06/2018 अन्वये मंजुरी प्रदान करण्यात आलेली आहे.

2) स्थायी समिती ठराव क्र. 157 दि. 25/06/2018 नुसार सिध्द शिघ्र गणकानुसार आवंटन करण्यात येणाऱ्या प्रत्येक ओटयांचे क्षेत्रफळानुसार मुल्य रू. 6,35,850/– निश्चित करण्यात आले असुन, मासिक परवाना शुल्क रू. 4,244/– आकारण्यात आला आहे. ओटयाचे मुल्य अग्रिम जमा (डिपॉझीट) करून प्रतिमहा परवाना शुल्क रू. 4,244/– यावर संबंधीतांना ओटयाचे आवंटन करण्याचे मंजुरी प्रदान केलेली आहे. याअनुषंगाने बाजार विभागातर्फे पत्र क्र. 672/एम.एस. दि. 6/07/2018 रोजी सचिव, श्री खोवा दलाल असोसिऐशन यांना आवंटनाबाबतचे मागणी पत्र (Demand) तामील करण्यात आले.

सदर मागणी पत्रावर असोसिऐशन यांनी आक्षेप घेऊन घेण्यात येणारे डिपॉझीट हे अप्रासंगीक व अन्यायकारक असुन, ही व्यवस्था कायमची नसुन तात्पुरत्या स्वरूपाची आहे असे कळविले आहे. कार्यालयाव्दारे सुधारीत प्रस्ताव तयार करण्यात आला व सदर प्रस्तावा प्रमाणे 11 महिन्याच्या मासिक परवाना शुल्काच्या दुप्पट रक्कम (4,244×11×2 = 93,368) रू. 95,000/– अनामत रक्कम म्हणुन घेण्याचे मा. आयुक्त, यांनी प्रस्तावित मान्य केलेले आहेत.

करीता उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 253:–** प्रभाग क्र. १२–ड येथील आकार नगर, जागृती कॉलोनी,
**{लोककर्म झोन 2}** वास्तुशिल्प कॉलोनी, फ्रेंडस् कॉलोनी, सरोजनगर, गजानन सोसायटी येथील रस्त्याच्या डांबरीकरणाच्या कामाकरीता एकूण तीन निविदाकारांपैकी निम्नतम निविदाकार मे. एल. सी. गुरुबक्षानी यांची वाटाघाटीद्वारे कामे केलेल्या दरांवर म्हणजे जुन्या प्राकलनीय दरांपेक्षा ७.१२% प्रतिशतने कमी दरांवर म्हणजे रु. ३६,७१,३९७/– ची निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 254:–** सन २०१८–१९ करीता आरोग्य विभागाद्वारे कृत्रिम तलाव
**{आरोग्य विभाग(एस)}** खरेदी बाबत, मा.आयुक्त यांचे दि.०१/०८/२०१८च्या मंजुरी तसेच मा.स्थायी समिती ठराव कं. १९१ दि.०४/०८/२०१८ च्या मान्यतेनुसार श्री गणेश मुर्ती विसर्जनामुळे तलावात होणारे प्रदुषण थांबविणे व पर्यावरणावर समतोल राखणे या करीता जिल्हा नियोजन समितीकडून नाविण्यपूर्ण योजने अंतर्गत विभागाला निधी उपलब्ध करण्यासाठी मा.आयुक्त यांच्या स्वाक्षरनिशी दि.०१/०८/२०१८ रोजी पत्र पाठविण्यात आले आहे. कुत्रिम तलाव खरेदी करण्याकरीता निविदा मागाविण्यात आल्या असुन दिनांक ०५/०९/२०१८ रोजी उघडण्यात आल्या त्यामध्ये एकुण तिन निविदाकाराने सहभाग घेतला त्यापैकी में. श्री एस सोल्युशन कंपणी नागपुर यांचे दर सर्वात कमी प्राप्त झाले असून निविदा दरकरार दर दोन वर्षाच्या कालावधीसाठी मान्य राहील.

सदरची खरेदी दहा झोनच्या प्राप्त मागणी नुसार करण्यात येणार आहे. प्राप्त मागणी बाबत झोन निहाय माहिती खालील प्रमाणे.

| कृत्रिम तलाव साईज | झोन १ | झोन २ | झोन ३ | झोन ४ | झोन ५ | झोन ६ | झोन ७ | झोन ८ | झोन ९ | झोन १० | महाल स्टोअर | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 12’x30” | 6 | 12 | 5 | 7 | 4 | 4 | 3 | 3 | 1 | 8 | 02 | 55 |
| 15’x36” | 10 | - | 10 | 10 | 10 | 3 | 4 | 5 | 1 | 6 | 01 | 60 |

उपरोक्त मागणी प्रमाणे निविदेतिल प्राप्त मंजुर दरानुसार अपेक्षित खर्च येणे प्रमाणे आहे.

| कृत्रिम तलाव साईज | मंजुर दर | एकुण तलावाची संख्या | अपेक्षित खर्च |
|---|---|---|---|
| 12’x30” with accessories | 34,180 Per Nos | 55 | 18,79,900 |
| 15’x36” with accessories | 37,800 Per Nos | 60 | 22,36,800 |
| | | एकुण खर्च | 41,16,700 |

वरील प्रमाणे एकुण कृत्रिम तलाव खरेदीकरिता रु. 41,16,700/—खर्च अपेक्षित आहे. सदर खर्च जिल्हा नियोजन समितीकडून नाविण्यपूर्ण योजने अंतर्गत प्राप्त निधीमधून करण्याचे प्रस्तावित आहे. निधी प्राप्त न झाल्यास विभागाचे व्यय पद क्रं. A44201272202 निधीमधून भागविण्यात येईल. किंवा जिल्हा नियोजन समितीकडून नाविण्यपूर्ण योजने कडून निधी प्राप्त झाल्यास त्यामधून भागविण्यात येईल व उर्वरित रक्कम आवश्यकते नुसार दरकरार मान्य असलेल्या दरानुसार प्रशासकिय मान्यता प्राप्त करुन खर्च करण्यात येईल. खर्च न झालेली रक्कम समायोजना द्वारे परत करण्यात येईल.

उक्त प्रस्ताव मान्य करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 255:—** **{लोककर्म झोन 10}** प्रभाग क्र. ११ अ बाबा फरीदनगर येथे रस्त्यांचे रूंदीकरण व डांबरीकरण आणि पावसाळी नाली टाकण्याचे कामकरण्याकरीता मागविण्यात आलेल्या ई निविदातील एकुण ४ अहर्ता प्राप्त निविदापैकी मे. आर. एम. गोपलानी यांची मुळ प्राकलनीय राशी पेक्षा १५% कमी दराची राशी रू. ६०,९८,५४६/—(साठ लक्ष अठ्ठयानव हजार पाचशे छेचाळीस रूपये फक्त) रकमेची प्रथम निम्नतम दराची निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजुरी प्रदान केली.

श्रीमती हर्षला साबळे :— मा.सभापती महोदय, बैद्यनाथ चौकामध्ये एक ट्रंक लाईन पुर्ण बसून गेली आहे ती ताबडतोब दुरूस्त करण्यांत यावी.

सभापती :— विभाग उस काम की जल्द से जल्द चौकशी करे और वह काम तुरंत कराये।

श्री मनोज सांगोळे :— मा.सभापती महोदय, अतिसंवेदनशील जे काम आहे, ज्याला मंजूरी मिळाली आहे व जे अर्थसंकल्पीय तरतुदीमध्ये राखीव आहे, ते काम ताबडतोब पुर्ण केले पाहिजे. माझे प्रभागात एस.आर.ए. स्कीम प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत सुरू आहे, त्याठिकाणी रात्रीच्या वेळेस लोकांना त्रास देण्यांत येत आहे, रस्त्यावर अंधार आहे, म्हाडाचे पत्र आले आहे नारी गांवचा पुल लोकांना येण्या—जाण्याकरिता आवश्यक आहे, स्थायी समितीमध्ये दोनदा मंजूरी मिळाल्यानंतर सुध्दा ते काम पुर्ण झाले नाही.

सभापती :— एस.आर.ए.की स्कीम का उदघाटन मा.मुख्यमंत्री महोदय करने वाले है। उस स्कीम मे विद्युत दिवे के काम का प्रोव्हीजन नही हो रहा है, रस्ते नही बन रहे है, जिसके कारण हम मा.मुख्यमंत्रीजी के हाथ से लोकार्पण नही ले पा रहे है। आलरेडी एस.आर.ए. अंतर्गत लोगो को वहां पर घर दिये गये है, वहां जो काम बाकी है वह सिरीअसली करवाया जाये। मा.सदस्या, श्रीमती हर्षला साबळे इन्होने जिस ट्रंक लाईन का विषय यहां प्रस्तुत किया है, उस तरीके के जितने सिव्हर लाईन से संबंधित काम है, ऐसे काम सहा.आयुक्त ने अपने अपने क्षेत्र के तुरंत करवाने चाहिये।

श्री महेश महाजन :— मा.सभापती महोदय, निविदा समिती की आवश्यकता है क्या ? इस बात की जानकारी दी जाये। यह जी.आर. कौनसे आदेश के तहत निकला है।

सभापती :— किसी काम को आयुक्त ने परवानगी देने के बाद उसके लिये समिती बनाना, यह बात समझ मे नही आयी।

कार्यकारी आयुक्त(श्री.रविंद्र ठाकरे) :— मा.सभापती महोदय, आपण या निविदा समिती पाहिली तर याच्यात अति.आयुक्त व संबंधित विभागाचे उपायुक्त, महानगरपालिका लेखा परीक्षक हे सर्व अधिकारी आहे. आम्ही या विषयाच्या संदर्भात सर्व अधिका—यांना सांगीतले आहे कि आपण याकरिता दोन दिवस ठरवुन घेवू सर्व अधिकारी एकाच ठिकाणी बसणार आहे त्याठिकाणी फाईलवर सर्व अधिका—यांची सही होवुन जाईल.

सभापती :— जब सभी लोग फाईल पर सही करते है तो फिर कमेटी बनाकर क्यों बैठ रहे है।

श्री जुल्फेकार भुटटो :– मा.सभापती महोदय, इस समिती मे विधी अधिकारी का काम है क्या ?

सभापती :– आज यहां पर स्थायी समिती की सभा शुरू है, सबको मालुम है, इसलिये कोई आज झोन मे नही गया। मैंने किसी व्यक्ति को झोन मे किसी काम से भेजा था वहां उनको बताया गया कि, स्थायी समिती की सभा होने के कारण साहब 3–30 बजे आयेगें। 365 मे से 250 दिन काम होता है, फिर उस पर यह निविदा समिती बनाई गयी है, जब ऑलरेडी सभी अधिकारीयो की फाईल पर सही होती है तो समिती की क्या आवश्यकता है। इस बात का विचार करते हुऐ अगर इसकी आवश्यकता नही होंगी तो यह समिती रद्य की जाये।

श्री मनोज सांगोळे :– मा.सभापती महोदय, एक लाख, दो लाख की फाईल इस निविदा समिती मे न भेजते हुऐ सहा.आयुक्त के लेव्हल पर होनी चाहिये।

सभापती :– यह जो निविदा समिती के बारे मे सर्क्युलर निकाला गया है, अगर इस समिती की आवश्यकता नही है तो यह रद्य करना चाहिये। झोन लेव्हल के काम छोटे रहते है इन सभी चिजो को ध्यान मे रखते हुऐ इसे रद्य किया जाये। जो काम स्थायी समिती ने सुझाये है वह महत्वपुर्ण काम है मगर देखने मे आरहा है कि, जो काम होरहे है उसकी क्वॉलिटी बरोबर नही है, मैंने दो साल पहले जिस रोड का भुमिपूजन किया था, आज रोड बनने के बाद दो साल मे वह खराब हो गया है वहां पर बडे पैमाने पर खडडे है, क्वॉलिटी की तरफ हमने ध्यान देना चाहिये। पिछली सभा मे मा.आमदार महोदय आये थे उनको मिलनेवाला शासकीय निधी डी.पी.डी.सी. के कामो की भी समिती बनाई है, इस संदर्भ मे मा.आयुक्त से बात करके इसे रद्य करना चाहियें। यह समिती कौनसे जी.आर.के तहत बनाई गयी है, उसकी कॉपी स्थायी समिती को भेजी जाये।

<u>ठराव क्रमांक 256</u> :– आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

सभापती
स्थायी समिती,
महानगरपालिका,नागपूर

# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
## (सचिवालय)

### स्थायी समितीच्या दिनांक 17.09.2018 रोजी भरलेल्या सभेच्या अहवालातून घेतलेला चर्चेचा उतारा

श्रीमती हर्षला साबळे :– मा.सभापती महोदय, बैद्यनाथ चौकामध्ये एक ट्रंक लाईन पुर्ण बसून गेली आहे ती ताबडतोब दुरूस्त करण्यांत यावी.

सभापती :– विभाग उस काम की जल्द से जल्द चौकशी करे और वह काम तुरंत कराये।

श्री मनोज सांगोळे :– मा.सभापती महोदय, अतिसंवेदनशील जे काम आहे, ज्याला मंजूरी मिळाली आहे व जे अर्थसंकल्पीय तरतुदीमध्ये राखीव आहे, ते काम ताबडतोब पुर्ण केले पाहिजे. माझे प्रभागात एस.आर.ए. स्कीम प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत सुरू आहे, त्याठिकाणी रात्रीच्या वेळेस लोकांना त्रास देण्यांत येत आहे, रस्त्यावर अंधार आहे, म्हाडाचे पत्र आले आहे नारी गांवचा पुल लोकांना येण्या–जाण्याकरिता आवश्यक आहे, स्थायी समितीमध्ये दोनदा मंजूरी मिळाल्यानंतर सुध्दा ते काम पुर्ण झाले नाही.

सभापती :– एस.आर.ए.की स्कीम का उदघाटन मा.मुख्यमंत्री महोदय करने वाले है। उस स्कीम मे विद्युत दिवे के काम का प्रोव्हीजन नही हो रहा है, रस्ते नही बन रहे है, जिसके कारण हम मा.मुख्यमंत्रीजी के हाथ से लोकार्पण नही ले पा रहे है। आलरेडी एस.आर.ए. अंतर्गत लोगो को वहां पर घर दिये गये है, वहां जो काम बाकी है वह सिरीअसली करवाया जाये। मा.सदस्या, श्रीमती हर्षला साबळे इन्होने जिस ट्रंक लाईन का विषय यहां प्रस्तुत किया है, उस तरीके के जितने सिव्हर लाईन से संबंधित काम है, ऐसे काम सहा.आयुक्त ने अपने अपने क्षेत्र के तुरंत करवाने चाहिये।

श्री महेश महाजन :– मा.सभापती महोदय, निविदा समिती की आवश्यकता है क्या ? इस बात की जानकारी दी जाये। यह जी.आर. कौनसे आदेश के तहत निकला है।

सभापती :– किसी काम को आयुक्त ने परवानगी देने के बाद उसके लिये समिती बनाना, यह बात समझ मे नही आयी।

कार्यकारी आयुक्त(श्री.रविंद्र ठाकरे) :– मा.सभापती महोदय, आपण या निविदा समिती पाहिली तर याच्यात अति.आयुक्त व संबंधित विभागाचे उपायुक्त, महानगरपालिका लेखा परीक्षक हे सर्व अधिकारी आहे. आम्ही या विषयाच्या संदर्भात सर्व अधिका–यांना सांगीतले आहे कि आपण याकरिता दोन दिवस ठरवुन घेवू सर्व अधिकारी एकाच ठिकाणी बसणार आहे त्याठिकाणी फाईलवर सर्व अधिका–यांची सही होवुन जाईल.

सभापती :– जब सभी लोग फाईल पर सही करते है तो फिर कमेटी बनाकर क्यों बैठ रहे है।

श्री जुल्फेकार भुटटो :– मा.सभापती महोदय, इस समिती मे विधी अधिकारी का काम है क्या ?

सभापती :– आज यहां पर स्थायी समिती की सभा शुरू है, सबको मालुम है, इसलिये कोई आज झोन मे नही गया। मैंने किसी व्यक्ति को झोन मे किसी काम से भेजा था वहां उनको बताया गया कि, स्थायी समिती की सभा होने के कारण साहब 3–30 बजे आयेगें। 365 मे से 250 दिन काम होता है, फिर उस पर यह निविदा समिती बनाई गयी है, जब ऑलरेडी सभी अधिकारीयो की फाईल पर सही होती है तो समिती की क्या आवश्यकता है। इस बात का विचार करते हुऐ अगर इसकी आवश्यकता नही होंगी तो यह समिती रद्य की जाये।

श्री मनोज सांगोळे :– मा.सभापती महोदय, एक लाख, दो लाख की फाईल इस निविदा समिती मे न भेजते हुऐ सहा.आयुक्त के लेव्हल पर होनी चाहिये।

सभापती :– यह जो निविदा समिती के बारे मे सर्क्युलर निकाला गया है, अगर इस समिती की आवश्यकता नही है तो यह रद्य करना चाहिये। झोन लेव्हल के काम छोटे रहते है इन सभी चिजो को ध्यान मे रखते हुऐ इसे रद्य किया जाये। जो काम स्थायी समिती ने सुझाये है वह महत्वपुर्ण काम है मगर देखने मे आरहा है कि, जो काम होरहे है उसकी क्वॉलिटी बरोबर नही है, मैंने दो साल पहले जिस रोड का भुमिपूजन किया था, आज रोड बनने के बाद दो साल मे वह खराब हो गया है वहां पर बडे पैमाने पर खडडे है, क्वॉलिटी की तरफ हमने ध्यान देना चाहिये। पिछली सभा मे मा.आमदार महोदय आये थे उनको मिलनेवाला शासकीय निधी डी.पी.डी.सी. के कामो की भी समिती बनाई है, इस संदर्भ मे मा.आयुक्त से बात करके इसे रद्य करना चाहियें। यह समिती कौनसे जी.आर.के तहत बनाई गयी है, उसकी कॉपी स्थायी समिती को भेजी जाये।